अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या वसतिगृहाच्या व्यवस्थापनाकरिता निधी उपलब्ध करण्याबाबत.
सन २०१९-२० करिता निधी वाटप.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः अविवि - २०१९/प्र.क्र.६०/का.८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ९ ऑगस्ट, २०१९.

वाचा -

१) अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्र. अविवि-२००९/प्र.क्र.१५/का.८, दि.०२ मार्च, २०१०,
२) अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्र. वसगृ-२०११/प्र.क्र.१३०/का.८, दि.२० डिसें., २०११,
३) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.०८ जुलै, २०१९,
४) जिल्हाधिकारी, जालना यांचे पत्र क्र. २०१९/साशा/अल्पसंख्याक/कावी-, दि. २५ एप्रिल, २०१९ चे पत्र,
५) अध्यक्ष, अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, कोल्हापूर यांचे पत्र क्र.आस्था/अल्पसं/२०१९-२०२०/४५३, दि.२४ मे, २०१९,
६) जिल्हाधिकारी, परभणी यांचे पत्र क्र.२०१९/अल्पसंख्याक/सा.प्र./कावि-५७, दि. ३ जून, २०१९,
७) जिल्हाधिकारी, अमरावती यांचे पत्र क्र.कक्ष-८/अ.का/अल्पसं/कावि ३६/२०१९, दि. ३ जून, २०१९,
८) संचालक, अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, शासकीय विज्ञान संस्था परीसर, औरंगाबाद यांचे पत्र क्र.अल्पमुवशाविसंऔ/२०१९/४०, दि.११ जुलै, २०१९,
९) जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे पत्र क्र.साशा/कार्या-१०/स्थानि-२/२०१९/९४७, दि. २२ जुलै, २०१९

प्रस्तावना -

राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनीसाठी वसतिगृहे बांधण्याबाबतचा शासन निर्णय, दिनांक २ मार्च, २०१० रोजी निर्गमित करण्यात आला आहे. राज्यातील विविध विद्यापीठांमध्ये उपलब्ध असलेल्या जमिनीवर अल्पसंख्याक मुलींसाठी वसतिगृह बांधण्यासंदर्भातील कार्यपध्दती दि.२० डिसेंबर, २०११ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आली आहे. तसेच अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांकरिता बांधण्यात येत असलेल्या वसतिगृहांच्या व्यवस्थापनाबाबत कार्यपध्दती दिनांक २१ जून, २०१३ व दि.२८ जुलै, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आली आहे.

अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या वसतिगृह बांधकाम करण्याकरिता सन २०१९-२० करिता "मागणी क्रमांक झेडई-१, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण, २०० इतर कार्यक्रम, राज्य योजनांतर्गत योजना (०१) (०८) शहरातील अल्पसंख्यांक समाजातील वसतीगृहाकरिता सहायक अनुदान (२२३५ ए १४२), ३१ सहायक अनुदान (वेतनेतर)"या लेखाशिर्षाखाली रु.१६.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. वित्त विभागाच्या संदर्भ क्र.३ च्या परिपत्रकान्वये तसेच सन २०१९-२० च्या अंदाजानुसार या आर्थिक वर्षातील प्रथम नऊमाहीकरिता आवश्यक असणारा कार्यक्रमावरील खर्चाचा अर्थसंकल्पित निधीच्या एकूण वार्षिक तरतूदीच्या ६०% च्या मर्यादेत म्हणजेच रू.९,६०,००,०००/-(अक्षरी रू. नऊ कोटी साठ लाख फक्त) निधी उपलब्ध करण्यात आला. संदर्भ क्र.४, ५, ६, ८ व ९ च्या पत्रांन्वये माहे सन २०१९-२० करिता (१) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, घनसावंगी, जालना, (२) अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, कोल्हापूर, (३) शासकीय

अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, गंगाखेड, परभणी, (४) शासकीय अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, परभणी, (५) शासकीय अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, पाथरी, परभणी, (६) शासकीय अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, सेलू, परभणी, (७) शासकीय अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, जिंतुर, परभणी, (८) शासकीय अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, पूर्णा, परभणी, (९) शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती, (१०) शासकीय विज्ञान संस्था परीसर, औरंगाबाद व (११) शासकीय अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, चंद्रपूर येथील वसतिगृहाच्या व्यवस्थापनाकरिता निधी वितरीत करण्याची मागणी केलेली असून सदरचा निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

जिल्हाधिकारी, जालना, कोल्हापूर, परभणी, अमरावती, औरंगाबाद व चंद्रपूर यांना वित्त विभागाच्या संदर्भ क्र. ३ च्या परिपत्रकास अनुसरून सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता आवश्यक असणारा कार्यक्रमावरील खर्चाचा अर्थसंकल्पित निधी एकूण वार्षिक तरतूदीच्या ६० % मर्यादेत एकूण रू.१,८०,३०,०००/-(अक्षरी रू.एक कोटी ऐंशी लाख तीस हजार फक्त) निधी खालीलप्रमाणे वितरीत करण्यास याव्दारे शासन मान्यता देण्यात येत आहे :-

अ.क्र.	वसतिगृहाचे ठिकाण	वितरीत करावयाची तरतूद
	व्यवस्थापनाकरिता	
१	औद्योगिक प्रशिक्षण संस्था, घनसावंगी, जालना	रू.१४,३०,०००/-
२	अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, कोल्हापूर	रू.१७,३०,०००/-
३	शासकीय अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, गंगाखेड, परभणी	रू.१५,३०,०००/-
४	शासकीय अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, परभणी	रू.१५,३०,०००/-
५	शासकीय अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, पाथरी, परभणी	रू.१७,३०,०००/-
६	शासकीय अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, सेलू, परभणी,	रू.१७,३०,०००/-
७	शासकीय अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, जिंतुर, परभणी	रू.१७,३०,०००/-
८	शासकीय अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, पूर्णा, परभणी	रू.१७,३०,०००/-
९	शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती	रू.१७,३०,०००/-
१०	शासकीय विज्ञान संस्था परीसर, औरंगाबाद	रू.१७,३०,०००/-
११	शासकीय अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, चंद्रपूर	रू.१४,३०,०००/-
	एकूण	**रू.१,८०,३०,०००/-**

२. वरीलप्रमाणे जिल्हाधिकारी, जालना, कोल्हापूर, परभणी, अमरावती, औरंगाबाद व चंद्रपूर यांना त्यांच्या अधिपत्याखालील (१) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, घनसावंगी, जालना, (२) अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, कोल्हापूर, (३) शासकीय अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, गंगाखेड, परभणी, (४) शासकीय अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, परभणी, (५) शासकीय अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, पाथरी, परभणी, (६) शासकीय अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, सेलू, परभणी, (७) शासकीय अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, जिंतुर, परभणी, (८) शासकीय अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, पूर्णा, परभणी, (९) शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती, (१०) शासकीय विज्ञान संस्था परीसर, औरंगाबाद व (११) शासकीय अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, चंद्रपूर येथील अल्पसंख्याक विद्यार्थिनींच्या वसतिगृहाच्या व्यवस्थापनाकरिता एकूण रू.१,८०,३०,०००/- (अक्षरी रू.एक कोटी ऐंशी लाख तीस हजार फक्त) एवढी रक्कम अर्थसंकल्प वितरण प्रणालीतून आहरण व संवितरण करण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

३. सदर तरतूद जिल्हाधिकारी, जालना, कोल्हापूर, परभणी, अमरावती, औरंगाबाद व चंद्रपूर यांचेकडे सुपूर्द करण्यात येत असून याकरीता जिल्हाधिकारी, जालना, कोल्हापूर, परभणी, अमरावती, औरंगाबाद व चंद्रपूर "नियंत्रक अधिकारी" आणि त्यांनी प्राधिकृत केलेले दुय्यम अधिकारी "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून काम पाहतील.

४. सदर निधीच्या विनियोगाबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हाधिकारी, जालना, कोल्हापूर, परभणी, अमरावती, औरंगाबाद व चंद्रपूर यांनी शासनास व महालेखापाल कार्यालयास सादर करावे तसेच अतिप्रदान व अखर्चित निधी परतावा शासनास भरणा (जमा) करण्याबाबत वित्त विभागाच्या दि. ८ जुलै, २०१९ रोजीच्या परिपत्रकातील सूचनानुसार संबधित जिल्हाधिकारी यांनी कार्यवाही करावी. उपरोक्त निधीचा आढावा घेऊन निधी अखर्चित रहात असेल वा समर्पित करावयाचा असेल तर तो B.D.S. प्रणालीवर दि. १६ मार्च, २०२० पर्यंत समर्पित करण्यात यावा. निधी योग्यवेळी समर्पित न केल्याने निधी वाया गेल्यास/ उपयोगात न आल्यास त्याची जबाबदारी जिल्हाधिकारी कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांची राहील.

५. सदरचा खर्च करताना वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत C.V.C. च्या मार्गदर्शक तत्वांचा/ CAG च्या निदेशानुसार कोणताही शासन निर्णय/अटी व शर्तींचा भंग होणार नाही याची दक्षता जिल्हाधिकाऱ्यांनी यांनी घ्यावी. सदर रक्कम वितरित करण्यापूर्वी जिल्हाधिकारी, जालना, कोल्हापूर, परभणी, अमरावती, औरंगाबाद व चंद्रपूर यांनी शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे निरिक्षण अहवाल/वित्तीय कार्यपध्दती यांचा अवलंब करावा. सदर रक्कम चालू आर्थिक वर्षात उपयोगात आणणे आवश्यक राहील. सदर निधी कोणत्याही संस्थेत ठेव स्वरुपात जमा करता येणार नाही.

६. सदरचा खर्च मागणी क्रमांक झेडई-१, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण, २०० इतर कार्यक्रम, राज्य योजनांतर्गत योजना (०१) (०८) शहरातील अल्पसंख्यांक समाजातील वसतीगृहाकरिता सहायक अनुदान (२२३५ ए १४२), ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) या लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

७. " सदर शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८ भाग पहिला, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दि. १७ एप्रिल, २०१५ अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त झालेल्या अधिकारांतर्गत किंवा त्या त्या विभागास वेळोवेळी वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-२ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार तसेच शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि. ८ जुलै, २०१९ मधील परिच्छेद ७ येथील अटींची व त्यासोबतच्या परिशिष्टांमधील अटींची पुर्तता होत असून प्राप्त मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे."

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक क्र. २०१९०८१३१६४०२५०४१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dinesh M. Sonavane

Digitally signed by Dinesh M. Sonavane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9cabb099fd0576208f4caa310d2e7860201ab5363a2133e0927ff26c0f016fdf, 2.5.4.45=032100CD9D66225CED8BAE27E0E1249D39EC14A54419D0A13504B49333B23F92B58199, cn=Dinesh M. Sonavane
Date: 2019.08.13 16:53:02 +05'30'

(दि.मा.सोनवणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखा व अनुज्ञेयता),मुंबई/नागपूर,

२) महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखा व परीक्षा), मुंबई/नागपूर,

३) प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,

४) जिल्हाधिकारी, जालना, कोल्हापूर, परभणी, अमरावती, औरंगाबाद व चंद्रपूर
५) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई ,
६) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई ,
७) प्राचार्य/ अध्यक्ष/ संचालक ((१) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, घनसावंगी, जालना, (२) अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, कोल्हापूर, (३) शासकीय अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, गंगाखेड, परभणी, (४) शासकीय अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, परभणी, (५) शासकीय अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, पाथरी, परभणी, (६) शासकीय अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, सेलू, परभणी, (७) शासकीय अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, जिंतुर, परभणी, (८) शासकीय अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, पूर्णा, परभणी, (९) शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती, (१०) शासकीय विज्ञान संस्था परीसर, औरंगाबाद व (११) शासकीय अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह, चंद्रपूर)
८) सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, पाचवा मजला, मुंबई,
९) अवर सचिव, का.७, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना विनंती करण्यात येते की त्यांनी उक्त रकमा संबंधिताना कृपया B.D.S. वर तात्काळ उपलब्ध करुन देण्यात याव्यात.
१०) जिल्हा कोषागार अधिकारी, जालना, कोल्हापूर, परभणी, अमरावती, औरंगाबाद व चंद्रपूर
११) वित्त विभाग (अर्थसंकल्प -१४, व्यय -४) मंत्रालय, मुंबई
१२) नियोजन विभाग (कार्या.१४७५)
१३) निवड नस्ती, का.८